ePaper

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न पुन्हा चिघळण्याची शक्यता; राऊतांचा शिंदेंवर निशाणा**

‖ वर्ष - 8 । अंक -151 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖



# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 09 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- बॅटचे झाले दोन तुकडे
- वाजपेयी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर
- बांगलादेशींना प्रवेश मिळणार नाही!
- वंचितही ईव्हीएमविरोधात आक्रमक!

### पुण्याला सांस्कृतिक कार्यमंत्रिपद अद्याप मिळालेले नाही

# चंद्रकांत दादांना सांस्कृतिक मंत्रिपद द्या!

## अभिनेते प्रवीण तरडे यांची मागणी

। पुणे । महाईन्यूज

‘पुणे शहर ही राज्याची सांस्कृतिक राजधानी आहे; परंतु पुण्याला सांस्कृतिक कार्यमंत्रिपद अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे चंद्रकांत पाटील यांनी हे मंत्रीपद पुण्याकडे आणावे,’ अशी मागणी अभिनेते, लेखक प्रवीण तरडे यांनी केली. ‘पुणे शहरात मोठ्या सांस्कृतिक महोत्सवांच्या आयोजनाची सुरुवात माजी खासदार सुरेश कलमाडी यांनी केली. त्यांना पुणेकरांची नस कळली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राजकीय विचारधारेच्या पलीकडे जाऊन कलमाडींच्या ‘पुणे फेस्टिव्हल’ला तीन कोटी रुपयांचा निधी दिला होता. ‘पुणे पुस्तक महोत्सवा’तही सर्व विचारधारेचे वाचक सहभागी झाले पाहिजेत,’ अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### मी पुणेकरच

‘पुण्यात ‘मी बाहेरून आलो’, ‘कोणाची तरी विधानसभेची जागा खेचून घेतली,’ असे आरोप माझ्यावर झाले; तरीही मी शांतपणे कार्यरत राहिलो. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यात प्रचंड मताधिक्याने मी निवडून आलो. त्यामुळे मी पुणेकरच असल्याचे शिक्कामोर्तब झाले,’ अशा शब्दांत माजी मंत्री व कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. पाच वर्षांपूर्वी २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने कोथरूड विधानसभेच्या तत्कालीन आमदार मेधा कुलकर्णी यांचे तिकीट कापून चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी दिली होती. त्या वेळी त्यांच्यावर ‘बाहेरचा उमेदवार’ म्हणून विरोधकांकडून निशाणा साधला जात होता.

### एक लाखांच्या मताधिक्याने कमळ फुलवलं

खुद्द चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कोल्हापूरला परतण्याची भाषा केली होती. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही शिवसेना नेते संजय राऊत यांनी ‘कोथरूडमधील कोल्हापूरचे पार्सल परत पाठवा,’ अशी खोचक टीका केली होती. मात्र, एक लाख १२ हजारांहून अधिक मताधिक्क्याने कोथरूडमध्ये पुन्हा कमळ फुलवून पाटील विजयी झाले.



### आपण पुणेकरच असल्याचे शिक्कामोर्तब

‘पुणे पुस्तक महोत्सवा’च्या नियोजनाच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये झालेल्या बैठकीत चंद्रकांत पाटील यांनी या मताधिक्क्याचा दाखला देऊन आपण पुणेकरच असल्याचे शिक्कामोर्तब झाल्याचे नमूद केले. ‘मी १९८२पासून पुण्यात येत आहे. माझ्यावर बाहेरून आल्याची, कोणाची तरी विधानसभेची जागा खेचून घेतल्याची टीका झाली, तरी मी शांत राहिलो. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यात सहाव्या क्रमांकाच्या सर्वाधिक मताधिक्क्याने निवडून येऊन मी पुणेकरच असल्याचे दाखवून दिले,’ असे ते म्हणाले.

---

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्ते उघडले

## रमेश बोरनारे यांची मुख्य प्रतोद पदी नियुक्ती, आमदारांना तातडीने व्हीप जारी

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदी रमेश बोरनारे यांची निवड करण्यात आली आहे. रमेश बोरनारे हे वैजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. त्यांची आता शिवसेनेच्या मुख्य प्रतोद पदी निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे मुख्य प्रतोद पदी निवड झाल्यानंतर लगेच रमेश बोरनारे यांनी शिवसेनेच्या सर्व 57 आमदारांसाठी व्हीप जारी केला आहे. विधिमंडळाचं सध्या विशेष



अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनाचा उद्या शेवटचा दिवस आहे. विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभेच्या सभागृहात विश्वास दर्शक ठराव मांडण्यात येणार आहे. यावेळी सभागृहात उपस्थित राहण्याचे आदेश मुख्य प्रतोद रमेश बोरनारे यांनी व्हीपद्वारे दिला आहे.

### रमेश बोरनारे यांनी व्हीपमध्ये नेमकं काय म्हटलंय?

“शिवसेना विधिमंडळ पक्षाच्या सर्व विधानसभा सदस्यांना पक्षादेश बजावण्यात येत आहे की, शनिवारी, 7 डिसेंबर 2024 पासून मुंबईत विधान भवन येथे विधिमंडळाचं विशेष अधिवेश सुरु होत आहे. या अधिवेशादरम्यान 9 डिसेंबर 2024 ला सरकारचा विश्वासदर्शक प्रस्ताव आहे. शिवसेना पक्षाच्या विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहात पूर्णवेळ उपस्थित राहून विश्वासदर्शक प्रस्तावाच्या बाजूने मतदान करावे, असा पक्षादेश आहे”, असं मुख्य प्रतोद रमेश बोरनारे यांनी व्हीपमध्ये म्हटलं आहे.

### रमेश बोरनारे कोण आहेत?

रमेश बोरनारे हे वैजापूरचे विद्यमान आमदार आहेत. ते 2019 च्या विधानसभा निवडणुकीवेळी देखील याच मतदारसंघातून निवडून आले होते. रमेश बोरनारे हे एकनाथ शिंदे यांचे खंदे समर्थक आहेत. शिंदे यांनी शिवसेनेत मोठं बंड पुकारलं त्यावेळी रमेश बोरनारे यांनी त्यांना खमकी साथ दिली होती. गुवाहाटीला जाणाऱ्या 40 शिवसेनेच्या आमदारांमध्ये रमेश बोरनारे यांचादेखील समावेश होता. विशेष म्हणजे 2022 ला झालेल्या सत्तांतरानंतर शिंदेंनी शिवसेना आमदार भरत गोगावले यांना मुख्य प्रतोद केलं होतं. पण यावेळी रमेश बोरनारे यांना संधी देण्यात आली आहे. कदाचित शिंदे यावेळी भरत गोगावले यांना मंत्रिपदाची संधी देणार आहेत. त्यामुळे प्रतोद पदी रमेश बोरनारे यांची वर्णी लागल्याची चर्चा आहे.

# ‘संयमाने वागून नेत्यांनी पराभव स्वीकारावा’!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शरद पवारांवर टीका

। पुणे / शिरूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘नेत्यांनी संयमाने वागायचे असते आणि पराभव स्वीकारायचा असतो. पराभव का झाला, हे पवार यांना माहिती आहे. त्यांनी जनतेचे, कार्यकर्त्यांचे ऐकावे, खोटे सांगणाऱ्या नेत्यांचे ऐकू नये,’ अशा शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली.**



विधानसभा निवडणुकीतील पराभवाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कोल्हापूर येथे बोलताना विधासभा निवडणुकीतील मतांची आणि उमेदवारांची आकेडवारी देताना निकालाबाबत भाष्य केले होते. त्यानंतर ‘एक्स’ या समाजमाध्यातूनही लोकसभेची आकेडवारील देत फडणवीस यांनी त्याला उत्तर दिले होते. या पार्श्वभूमीवर शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथे मळगंगा मंदिर (कुंडा ) जवळ कोपर्डी येथील पीडीत महिलेच्या घरातील लग्नसमारंभाला फडणवीस रविवारी उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना पुन्हा पवार यांच्यावर टीका केली.

‘शरद पवार प्रदीर्घ अनुभव असलेले नेते आहेत. अशा नेत्याने संयमाने वागायचे असते. पराभव स्वीकारायचा असतो. कार्यकर्त्यांच्या दबावाखाली पवार असे वागत असतील. मात्र,पराभव काय झाला, हे पवार यांना माहिती आहे. त्यांनी जनतेचे ऐकावे. कार्यकर्ते आणि खोटे बोलणाऱ्या नेत्यांचे ऐकू नये. लोकशाहीवरील लोकांचा विश्वास उडेल, अशी कृती पवार यांनी करू नये,’ असे फडणवीस यांनी सांगितले.

### शरद पवार काय म्हणाले?

मुख्यमंत्र्यांना विनंती करतो इथं आम्हाला राजकारण आणायचं नाही. आम्हाला इथे घडलं, इथल्या लोकांच्या मनात शंका आहे. त्याचं निरसन करायचं आहे. असं कुठं होऊ नये जेणे करून निवडणूक आयोगाच्या मनात गैरविश्वास जनतेत होऊ नये एवढंच आहे. त्यात राजकारण नाही. म्हणून मी सांगतो तसा ठराव करा. आम्ही ही माहिती राज्यसरकार, केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाकडे देऊ. शक्य झालं तर मुख्यमंत्र्यांनी मान्य केलं. तर त्यांना सांगेल गावात या. लोकांचं म्हणणं ऐका. महिलांचं ऐका. शक्य असेल त्यांच्या मनातील शंका दूर करा. असं आम्ही सीएमला सांगणार. मुख्यमंत्री इकडे यायला आमची अडचण नाही, असं शरद पवार मारकडवाडीत म्हणालेत.

### निकालाच्या आकडेवारीवर काय म्हणाले?

शरद पवार निवडणुकीच्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार यांनी काल निवडणूक प्रक्रिया, आकडेवारी आणि निवडून आलेल्या आमदारांची संख्या यावरून काही प्रश्न उपस्थित केले. आम्ही प्रत्येक पक्षाला किती मते मिळाली आणि किती उमेदवार निवडून आले याची आकडेवारी काढली. पण जोपर्यंत आमच्याकडे काही आधार नाही. तोपर्यंत भाष्य करणं योग्य नाही. पण मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत, असं शरद पवारांनी काल म्हटलं. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत शरद पवार यांच्या या आकडेवारीच्या विधानाला आकडेवारीने उत्तर दिलं.

---

# पुढील तीन दिवस राज्यावर पावसाचे सावट

## हिवाळ्यात ‘यलो अलर्ट’, थंडीचा जोर कमी

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुढील ४८ तासांत कोकण गोव्यातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर तर मराठवाड्यातील संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील.**



फेंगल चक्रीवादळानंतर राज्यातील वातावरणात बदल होत आहे. कधी थंडी तर कधी आभाळ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील काही भागांत पाऊस पडत आहे. आता कोकण-गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे पुढील तीन दिवस राज्यावर पावसाचे सावट असून काही जिल्ह्यांना ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे. दुसरीकडे राज्यात असलेला थंडीचा जोर कमी झाला आहे.

### हवामान विभागाचा अंदाज काय?

पुढील ४८ तासांत कोकण गोव्यातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर तर मराठवाड्यातील संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील. यावेळी वाऱ्यांचा वेग ताशी ३० ते ४० एवढा असेल.

### गोंदिया जिल्ह्यात पाऊस

गोंदिया जिल्ह्यात चार ते पाच दिवसापासून ढगाळ वातावरण आहे. आज सकाळपासून जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे धान पिकाबरोबर भाजीपाला आणि तुर पिकांचे नुकसान होणार आहे. कापलेला धान या पावसामुळे खराब होण्याची शक्यता आहेत. या पावसामुळे भाजीपाला, तुर पीक यांना सुद्धा फटका बसणार असल्याने शेतकरी चिंतेत आला आहे.

### पुण्यात पावसाचा सरी पडणार

पुणे शहर आणि जिल्ह्यातही पुढील दोन दिवस हवामान कोरडे तर दुपारनंतर ढगाळ वातावरण राहील.जिल्ह्यातील काही भागातच्या पावसाच्या हलक्या सरी पडतील. शुक्रवारी दिवसभर ऊन आणि ढगाळ वातावरणाचा खेळ सुरू होता. कमाल व किमान तापमान स्थिर असल्यामुळे काल दिवसभर शहरात चांगलाच उकाडा जाणवत होता.

### धाराशिवमध्ये पाऊस

धाराशिव शहरासह तुळजापूर तालुक्यात काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. दोन दिवसांच्या ढगाळ वातावरणानंतर पाऊस आल्याने शेतीचे नुकसान होणार आहे. रब्बी हंगामातील गहू, हरभरा, भाजीपाला आदी पिकांना हा पाऊस धोकादायक ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्याची चिंता वाढल्याचे दिसत आहे. अवकाळी पावसाने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही मोठी घट होणार आहे. पुणे वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार कमी दाबाचे क्षेत्र उत्तर तामिळनाडूवर आहे. त्यामुळे महाराष्ट्रात आर्द्रता व दमटपणा वाढत आहे. पुढील चार ते पाच दिवस महाराष्ट्रातील चारही उपविभागात हलक्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, उस्मानाबाद, सोलापूर आणि लातूर जिल्ह्यासाठी ५ डिसेंबरला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुण्यात पुढील तीन दिवस शहरात प्रामुख्याने ढगाळ वातावरण राहील. पुणे शहरातील कमाल तापमान २९.६ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले जे सामान्य पातळीवर आहे. सध्या महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान सामान्यपेक्षा कमी आहे.

तथापि, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान सामान्य पातळीपेक्षा जास्त आहे. राज्यात ५ आणि ६ डिसेंबर रोजी हलक्या ते अतिशय हलक्या पावसाची शक्यता असून इतर वेळी हवामान हवामान ढगाळ असेल, असे आयएमडी पुणेचे वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ एस.डी. सानप यांनी सांगितले.

# पिंपरी-चिंचवडकरांना आता मिळणार नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना!

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आयएमडी यांच्यामध्ये सामंजस्य करार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराचे बदलते हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना व त्यांचे परिणाम, आपत्ती व्यवस्थापन करताना राबविल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभाग (आयएमडी) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. हवामान बदलातील विविध आव्हाने सक्षमपणे हाताळण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**



निगडी येथील दुर्गादेवी टेकडी येथे हवामान बदलाचे संकेत देणारा अत्याधुनिक एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार मनोरा उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी निश्चित केलेल्या जागेची पाहणी महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पुणे येथील भारतीय हवामान विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ के. एस. होसाळीकर यांनी केली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मनोज सेठिया, उदय जरांडे, ओमप्रकाश बहिवाल, उमेश ढाकणे, किरण गायकवाड, योगेश वाळूंज तसेच भारतीय हवामान विज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ उदय शेंडे, डॉ. शिजो झकारिया, अश्विन राजू डी. के आदी उपस्थित होते. रडार प्रणाली उभारण्यासाठी महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून देण्यात आली असून हवामान विभागामार्फत त्या ठिकाणी रडार उभारण्यात येणार आहे.

जागतिक स्तरावरील हवामान झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती येण्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. बदलते हवामान आणि त्यामुळे उद्भवणारी आपत्ती यावर संरचनात्मक उपाययोजना करण्यासाठी तसेच शहराच्या शाश्वत विकासासाठी हवामान व वातावरणीय बदलाच्या माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये झालेला सामंजस्य करार भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले. या करारानुसार भारतीय हवामान खाते पिंपरी चिंचवड महापालिकेला वेळोवेळी शहरातील हवामानाचे अंदाज तसेच त्याबाबत करावयाच्या उपाययोजना याबाबत सूचना देणारी माहिती पुरवणार आहे. या माहितीचा उपयोग महापालिकेला विविध उपाययोजना आणि नियोजन करण्यासाठी होणार असल्याचे आयुक्त सिंह यावेळी म्हणाले.

### "एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार"

"एक्स-बँड डॉप्लर वेदर रडार" एक अत्याधुनिक स्वदेशी रडार प्रणाली आहे. या प्रणालीचे कार्यपरिक्षेत्र सुमारे १०० किलोमीटर परिघात असणार आहे. यामध्ये पिंपरी चिंचवड शहरासह पुणे जिल्ह्याच्या संपूर्ण क्षेत्राचे, गड परिसर आणि आसपासच्या भागांचा समावेश असणार आहे. आपत्तीजनक हवामान घटनांची वास्तविक-समय निरीक्षण क्षमता, अत्याधिक पाऊस, वादळ, गारपीट, इत्यादींचा अभ्यास करण्यासाठी या रडारप्रणालीद्वारे महत्त्वपूर्ण माहिती मिळणार आहे. पिंपरी चिंचवड शहरावर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकांची माहिती महापालिकेला वेळोवेळी पुरवली जाणार असल्याचे के. एस. होसाळीकर यांनी यावेळी सांगितले.

# नो पार्किंगमध्ये वाहन लावल्यास आता दंड

## 'टोईंग'चा भुर्दंड: कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांद्वारे टोइंग व्हॅन प्रकल्प सुरू

। लोणावळा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाहतूक विभागाचा आदेश झुगारून नागरिकांकडून 'नो पार्किंग झोन'मध्ये, रस्त्यावर, जागा मिळेल त्या ठिकाणी बेकायदा वाहने लावली जात असल्याने वाहतूककोंडीत भर पडत आहे. ही कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी टोइंग व्हॅन प्रकल्प कार्यान्वित केला आहे. अशा पद्धतीने वाहन लावल्यास टोइंगचा खर्च, वस्तू आणि सेवा करासह (जीएसटी) दंड वसूल केला जाणार आहे. दुचाकीसाठी ७३६ रुपये, तर चारचाकीसाठी ९७२ रुपये दंड आकारला जाणार आहे.**




पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव हे औद्योगिक क्षेत्र, हिंजवडी, तळवडे ही माहिती आणि तंत्रज्ञान नगरी असून देहू आणि आळंदी तीर्थक्षेत्रे आहेत. यासह मोठ्या बाजारपेठा, तसेच शैक्षणिक आणि व्यापारी संकुले आहेत. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते. दुचाकी, तसेच चारचाकी वाहनांचा वापर करणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असून, अनेकजण दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा वापर करीत असतात. मात्र, काही जण पार्किंगचे नियम न पाळता बेशिस्तीने कोठेही वाहन पार्क करतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे.

### असा असेल दंड

दुचाकींसाठी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग शुल्क, ३६ रुपये जीएसटी असे ७३६ रुपये, तर चारचाकी वाहनांसाठी ५०० रुपये दंड, ४०० रुपये टोइंग शुल्क आणि ७२ रुपये जीएसटी असा ९७२ रुपये दंड आकारला जात आहे. टोइंग केलेल्या वाहनावर पूर्वीचे चलन आहे का, याची वाहतूक पोलीस तपासणी करतील. प्रलंबित चलनांपैकी एक आणि आताच्या कारवाईचे एक चलन किमान भरणे बंधनकारक असणार आहे. पूर्वी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग चार्ज, ३६ रुपये जीएसटी असा एकूण ७७६ रुपये दंड आकारला जात होता. आता दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र दंडाची रक्कम आकारली जात आहे.

### वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही कारवाई

वाहनचालकांनी पार्किंगच्या नियमांचे पालन करावे. नो पार्किंगमध्ये तसेच वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने वाहन लावल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही कारवाई केली जात असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी सांगितले.




# उपमुख्यमंत्री ते मंत्रीपदाच्या तडजोडी !

**२३ नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर पाच डिसेंबरला मोठ्या थाटात शपथविधी पार पडला. सुरुवातीला फडणवीस-शिंदे-पवार यांच्या भेटीगाठी दिल्लीत झाल्यात. त्यानंतर पक्षनिरीक्षक महाराष्ट्रात आलेत आणि गटनेते म्हणून फडणवीस यांची एकमताने निवड केली.**

त्यानंतर तिनही पक्षाच्या गटनेत्यांनी बहुमताची यादी राज्यपालाला दिली. राज्यपालाला बहुमताची यादी देण्यापूर्वीच शपथविधीची तारीख ठरली. सचिवाने शपथविधीची निमंत्रण पत्रिका बनविली. एकाच संविधानाने केंद्र व राज्यसरकारची रचना व अधिकार निश्चित केलेत. घटकराज्याच्या सरकार स्थापनेत राज्यपालाची भूमिका अधिक महत्त्वाची असते. मुळात बहुमत तपासून राज्यसरकार स्थापन करण्याचा घटनात्मक अधिकार राज्यपालालाच आहे. राज्यपाल बहुमत तपासल्यानंतर मुख्यमंत्री पदाकरिता बहुमतधारी पक्षाला किंवा आघाडीच्या नेत्याला निमंत्रण देतात. असे असताना बहुमताच्या जोरावर राज्यपालांच्या अधिकार कक्षेत हस्तक्षेप केल्याने त्याचा आधार घेवून संविधान बदलविण्याची चर्चा रंगते. मग पुन्हा नॅरेटिव्ह म्हणून खुलासे सुरू होतात.महायुतीत तीन पक्ष असल्याने एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असे सूत्र ठरले. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात



मोठे यश मिळाल्याने त्यांना मुख्यमंत्री पद हवे होते. त्याकरिता चर्चेच्या काही फेऱ्या झाल्यात, मात्र तडजोड होत नसल्याने तत्कालीन काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदे आपल्या शेतावर निघून गेले. सुरुवातीला ताठर भूमिका घेणारे शिंदे नंतर मात्र समन्वयाच्या भूमिकेत आले. ईडीची पिडा टाळायची असेल, पक्ष टिकवायचा असेल तर सत्तेत सहभागी होणे आवश्यक होते. त्यांच्या बाबतचे अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत याची जाणीव बहुदा भाजपाने करून दिली असावी. मुख्यमंत्री पद देण्यास भाजपा तयार नसल्याने शेवटी त्यांनी गृहमंत्री पदावर दावा केला. या पदाची जाहीर मागणी शिवसेनेच्या आमदारांनी केली. शिंदे सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असतांना त्यांनी गृहमंत्री पद स्वतःकडे ठेवले. तोच धागा धरून शिंदेंनी गृहमंत्रालयाची मागणी केली. म्हणूनच ते उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतात किंवा नाही याबाबतचा सस्पेन्स शपथविधीच्या तिन तासापर्यंत कायम होता. सरतेशेवटी एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यास तयार झालेत. या नाराजी नाट्याचा परिणाम म्हणजेच फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची तर शिंदे आणि अजितदादांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मंत्रीपदाकरिता बाशिंग बांधून तयार असणाऱ्या आमदारांना मात्र काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. महायुतीतील तीनही पक्षाच्या एका-एका नेत्यानेच शपथ घेतल्याने सर्व आलबेल आहे असे म्हणता येणार नाही. भाजपाकडे जवळजवळ १३८ आमदार असतानाही घटक पक्षांकडून महत्त्वाच्या खात्यांकरिता दबावतंत्राचा वापर होतो आहे. यानंतर जिल्ह्याच्या पालकमंत्र्याबाबतही रस्सीखेच होणारच.मुख्यमंत्रीपदानंतर गृह, अर्थ, महसूल, नगरविकास आणि सार्वजनिक बांधकाम विभाग ही खाती महत्त्वाची असतात. असे मंत्रालय मिळविण्यासाठी स्पर्धात्मक राजकारण चालते. तडजोडीच्या राजकारणात मुख्यमंत्री पद मिळत नसेल तर गृहमंत्रालयाला किंवा अर्थमंत्रालयाला प्राधान्य दिले जाते. मित्र पक्षांचे सर्व रुसवे-फुगवे या विभागासाठी सुरू असतात. एकनाथ शिंदेंनी पहिल्यांदा तर अजितदादांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. मुख्यमंत्र्यांसोबत इतर काही मंत्री शपथ घेत असतात. उपमुख्यमंत्री पद हे संवैधानिक पद नसल्याने राज्यपाल उपमुख्यमंत्री पदाची शपथ देऊ शकतात का ? देशात सोळा राज्यात उपमुख्यमंत्री पद आहे. आंध्रप्रदेशातील जगमोहन रेड्डी सरकारमध्ये पाच उपमुख्यमंत्री होते. मुख्यमंत्र्याच्या शिफारशीवरून राज्यपाल त्यांना उपमुख्यमंत्री पदाचा दर्जा देतात. विधानसभेच्या हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांच्या शपथविधीवेळी संविधानिक पदावरील मान्यवर राजभवनात उपस्थित होते. मात्र उपमुख्यमंत्री उपस्थित नव्हते.राज्यघटनेत या पदाचा कोणताही उल्लेख नसल्याने उपमुख्यमंत्री म्हणून अधिकारांची तरतूद नाही.

## प्रासंगिक »

### ते पुन्हा आलेच!

***महाराष्ट्रातही आता राजकारणाचा गुजरात पॅटर्न राबविला जाणार आहे. हा पॅटर्न यशस्वी करण्यासाठी फडणवीस यांच्याशिवाय पर्याय नाही.***

वेळोवेळी धक्कातंत्र वापरण्यामध्ये भाजपचा हातखंडा आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा या राज्यांमध्ये भाजप धक्कातंत्र वापरू शकला; मात्र महाराष्ट्रात असे धक्कातंत्र भाजपला आणि त्याच्या दिल्लीतील नेत्यांना वापरता आले नाही. त्यामागे विविध कारणे असली, तरी देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या दशकात महाराष्ट्रात केलेली कामगिरी पाहता त्यांच्याशिवाय पक्षापुढे दुसरा सक्षम पर्यायच नव्हता. मी पुन्हा येईन असा घोषा फडणवीस यांनी सातत्याने लावला होता आणि ते खरोखरीच परत मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. ठेवले. बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा, निकालानंतर महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचा पाठिंबा आणि शिवसेनेच्या शिंदे गटातील काही आमदारांचाही पाठिंबा, अपक्षही मदतीला असे असल्यानंतर फडणवीस यांना डावलून अन्य नेत्याची मुख्यमंत्रिपदी वर्णी लावणे शक्यच नव्हते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन सभा, अकोला यांच्या वतीने दरवर्षी ४ डिसेंबर ते ६ डिसेंबर अशी तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित केली जाते. या वर्षी व्याख्यानमालेचे १६ वें वर्ष साजरे होत असून दिनांक ४ डिसेंबर, २०२४ रोजी या व्याख्यानमालेचे पहिले विचारपुष्प ॲड. जयमंगल धनराज, प्रख्यात विधीज्ञ उच्च न्यायालय मुंबई यांनी गुंफले.

# संविधानशील माणूस घडविणे काळाची गरज...!

"भारतीय संविधान : लोकशाही सद्यस्थिती आणि भवितव्य" या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी करत श्रोतूवर्गाला अंतर्मुख तर केलेच पण प्रत्येकाने संविधानाचा जागर करावा, संवैधानिक मूल्ये समाजात रुजवावी आणि देशाचा प्रत्येक माणूस संविधानशील घडविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे असे आवाहन केले. त्यांनी आपल्या भाषणात प्रारंभी सांगितले की, संविधान आणि लोकशाही हे विषय चर्चा करून करून गुळगुळीत झाले असे वाटत असले तरी या विषयाची सातत्याने चर्चा होणे तेवढेच महत्वाचे आहे. कारण संविधान स्वीकारून ७५ वर्षाचा काळ पूर्ण झाला तरीही संविधान निर्माणकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित संवैधानिक भारत आम्ही घडवू शकलो नाही. कारण संविधानाची प्रामाणिक अंमलबजावणी करण्यात आमचे राज्यकर्ते असमर्थ ठरले. संविधान म्हणजे काय तर देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्था आणि न्यायव्यवस्था यांची रचना कशी



असेल याचा लिखित दस्तऐवज होय. आपल्या संविधान सभेने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित संविधानाची रचना केली असून ती क्रांतिकारक आहे. तसेच संविधानात काळानुसार व गरजेनुसार बदल करण्याची तरतूद करून ठेवली आहे.

कारण समाज हा गतिशिल असतो तसे सर्व गतिशील असावे अशी व्यवस्था केली आहे.देशात लोकशाही यशस्वी करायची असेल तर त्यासाठी काही पूर्व अटी पूर्ण झाल्या पाहिजेत असे संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे. त्यांनी दिनांक २२ डिसेंबर, १९५२ रोजी पुणा डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररीच्या हॉल मध्ये आयोजित केलेल्या भाषणात बोलतांना सांगितले होते की, "जर लोकशाही यशस्वी करायची असेल तर सर्वात प्रथम आवश्यक बाब ही की, समाज व्यवस्थेत विषमता नसली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे सक्षम विरोधी पक्षाचे अस्तित्व. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जरूर असलेली तिसरी बाब म्हणजे वैधानिक व कारभार विषय क्षेत्रात (प्रशासनात) पाळावयाची समता होय. चौथी गोष्ट म्हणजे संवैधानिक नीतीचे पालन, पाचवी बाब म्हणजे लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्याकांची गळचेपी बहुमतवाल्यांकडून होता कामा नये. अल्पसंख्याकांना सुरक्षितता वाटली पाहिजे. सहावी बाब म्हणजे नीतिमान समाज व्यवस्थेची अत्यावश्यकता आणि सातवी बाब म्हणजे विचारी किंवा विवेकी लोकमत होय."या गोष्टींची पूर्तता झाल्याशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही.धनराज पुढे म्हणाले की, आपल्या लोकशाहीचे तीन टप्पे विचारात घेतले तर १९५० ते १९८९ या काळात काँग्रेसची एकहाती सत्ता होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## सायंकाळी 5 नंतर झालेल्या मतदानावर वंचितचा आक्षेप

# वंचितही ईव्हीएमविरोधात आक्रमक!

## थेट निवडणूक आयोगाला पत्र; विचारले तीन प्रश्न

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर जवळपास सर्वच विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनी ईव्हीएममध्ये घोळ करून ही निवडणूक जिंकली असल्याचा दावा केला जात आहे. त्याचबरोबर मतदानाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजल्यानंतर ७५ लाखांहून अधिक लोकांनी मतदान केल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली होती. अनेक ठिकाणी रात्री ११.३० वाजेपर्यंत मतदान चालू होतं असंही सांगण्यात आलं होतं. या आकडेवारीवर विरोधी पक्षांनी संशय व्यक्त केला आहे. अशातच वंचित बहुजन आघाडीने देखील निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त करत निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवलं आहे. या पत्राद्वारे वंचितने निवडणूक आयोगाला तीन प्रश्न विचारले आहेत.**




वंचितने आपल्या पत्रात म्हटलं आहे की "नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीशी संबंधित अतिशय गंभीर प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी आम्ही तुम्हाला (राज्य मुख्य निवडणूक आयुक्त) पत्र लिहित आहोत. नुकत्याच पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेवरील आमचा विश्वास डळमळीत आणि घसरला असल्याने आम्ही ही उत्तरे शोधत आहोत; निवडणुका प्रलोभनमुक्त आणि पारदर्शक नव्हत्या यावर विश्वास ठेवण्याची आमच्याकडे कारणे आहेत. एका मुलाखतीत, माजी मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) यांनी तात्पुरत्या मतदारांच्या मतदानाची आकडेवारी आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील अंतिम डेटा यांच्यातील व्यापक तफावताबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. संध्याकाळी ५ वाजता मतदानाची टक्केवारी ५८.२२ टक्के होती, आणि मतमोजणी जाहीर झालेल्या अंतिम मतदानाची टक्केवारी आश्चर्यकारकपणे ७.८३ टक्क्यांनी वाढून ६६.०५ टक्के झाली आहे".

प्रकाश आंबेडकरांच्या पक्षाने निवडणूक आयोगाला विचारलं आहे की "२० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता एकूण मतदारांची संख्या ५,६४,८८,०२४ असेल. रात्री ११.३० पर्यंत, मतदानाची टक्केवारी ६५.०५ टक्क्यांवरी वर गेली होती, ज्याचा एकूण आकडा ६,३०,८५,७३२ असेल. संध्याकाळी पाच ते रात्री ११.३० वाजेपर्यंत एकूण मतदान झालेल्या एकूण मतांमध्ये ६५,९७,७०८ मतांची वाढ झाली आहे. म्हणजेच जवळपास ६६ लाख मतं वाढली आहेत. मतमोजणीच्या काही तासांपूर्वी पुन्हा एकूण मतांमध्ये ९,९९,३५९ मतांची वाढ झाली, यापेक्षा आश्चर्याची गोष्ट काय असेल. २० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ ते २२ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजेपर्यंत ७५,९७,०६७ मतांची वाढ झाली. हे 'उशीरा' झालेले आकडे केवळ आश्चर्यकारकच नाहीत तर निवडणूक प्रक्रियेवरही प्रश्न उपस्थित करतात.

### मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र हे सांगतील का?

१. मतदाराला त्याचे/तिचे/त्यांचे मत देण्यासाठी लागणारा वेळ

२. जिल्हा निवडणूक अधिकारी/रिटर्निंग अधिकारी आणि पर्यवेक्षक यांनी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ ते संध्याकाळी ६ या वेळेत झालेल्या मतांची नोंद केली आहे का. तशी नोंद झाली असल्यास त्याचा तपशील देणे

३. जिल्हा निवडणूक अधिकारी/रिटर्निंग ऑफिसर यांनी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५:५९ वाजता रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना जारी केलेल्या टोकनची संख्या नोंदवली आहे का? नोंदवली असल्यास, त्याचा तपशील द्यावा.

> आम्हाला आशा आहे की आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील कारण संपूर्ण महाराष्ट्र उत्तरांची वाट पाहत आहे. आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळणे आणि आमच्या चिंतेचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे. कारण ते भारतीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक प्रक्रिया आणि आचरणावरील घसरलेल्या आणि डळमळलेल्या विश्वासाची प्रशंसा करतील.
>
> **–प्रकाश आंबेडकर**

---

## प्रतापगड येथे शिवप्रताप दिन साजरा

## छत्रपतींच्या अश्वारुढ पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवर्षाव

। सातारा ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ढोलताशांचा गजर, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष, रोमांच उभा करणारा तुताऱ्या, झांजांचा आवाज आणि हेलिकॉप्टरमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यावर पुष्पवृष्टी, शिवकालीन धाडशी खेळांचे अंगावर शहारे आणणारे प्रात्यक्षिक अशा अलोट उत्साहात आज किल्ले प्रतापगडावर (ता. महाबळेश्वर) शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



सकाळी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकियन एस, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात आई भवानी मातेची महापूजा करण्यात आली.

भवानी मातेच्या मंदिरासमोर ध्वजस्तंभाचे मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करुन शिवशाहीचे प्रतीक असणाऱ्या भगव्या ध्वजाचे रोहणवाडा कुंभरोशीचे सरपंच कांचन सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ढोल, तुताऱ्या, लेझीम यांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला.

भवानीमातेच्या आरतीनंतर मानाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची पालखीची वाजत गाजत मिरवणूक सुरु झाली. पोलीस अधीक्षक, अप्पर जिल्हाधिकारी यांच्यासह सर्व उपस्थित मान्यवरांनी पालखी घेऊन मिरवणूक मार्गस्थ केली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जावली, दरे, वाडा कुंभरोशीच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींचे लेझीम- तुताऱ्या, काठीवर चालणारी मुले, आई भवानी मातेचा व शिवरायांचा जयजयकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घोषणांनी मिरवणूक मार्ग दुमदूमून गेला.

पालखीचे शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याजवळ आगमन झाल्यावर पुतळ्यास व पालखीस पुष्प अर्पण करुन भक्तिभावे पूजन करण्यात आले. यावेळी 'क्षत्रिय कुलावतंस, राजाधिराज....,' या ललकारीने, शिवरायांच्या जयजयकाराच्या घोषणांनी वातावरण भारुन गेले होते.

### धाडसी खेळांची प्रात्यक्षिक

लहान मोठ्या विद्यार्थ्यांसह लाठी काठी, तलवारबाजी, दांडपट्टा, कुऱ्हाडबाजी, अग्निचक्र, गनिमीकावा आदी ऐतिहासिक खेळांची डोळ्यांचे पारणे फेडणारी प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

### प्रशासनाचा निषेध

१० नोव्हेंबर १६५९ रोजी किल्ले प्रतापगडावर शिवाजी महाराज व अफजलखान यांची भेट झाली होती. हा इतिहास असतानाही सातारा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शिवप्रताप दिन तिथीनुसार साजरा केला जातो. याविषयी वारंवार निवेदन देऊनही जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केला जाणारा शिवप्रताप दिन हा तिथीनुसार न करता तारखेनुसार करावा. तरीही जिल्हा प्रशासन मात्र तिथीनुसार शिवप्रताप दिन साजरा करते. त्याच्या निषेधार्थ आज सातारा येथील पोवई नाक्यावर शिवतीर्थावरती शिवप्रेमींकडून माफ करा शिवबा राजे म्हणत आत्मक्लेष उपोषण करण्यात आले. यामध्ये ऋषिकेश गायकवाड, वैभव शिंदे, महेंद्र साठे, विक्रम गायकवाड, अशोक पवार, विष्णू आवारे, लक्ष्मण पोळ, अविनाश तुपे उपस्थित होते.

# बांगलादेशींना प्रवेश मिळणार नाही!

## हिंदूंवरील अत्याचाराविरोधात आसामच्या हॉटेल मालकांचा निर्णय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये इस्कॉनचे पुजारी चिन्मय कृष्णा दास यांना अटकेनंतर अल्पसंख्याक समुदायावरील अत्याचारात वाढ झाली आहे. वाढत्या अत्याचाराविरोधात भारतात देखील निदर्शने केली जात आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार थांबत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही बांगलादेशींना हॉटेलमध्ये राहू दिले जाणार नाही आणि कोणतीही मदत केली जाणार नाही, असा निर्णय आसामच्या बराक व्हॅली हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनने घेतला आहे.**



बांगलादेशातील परिस्थिती काय आहे हे सध्या संपूर्ण जगाला माहित आहे. येथे अल्पसंख्याकांना कसे लक्ष्य केले जात आहे. त्यांच्यावर होणारे अत्याचार वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतात देखील अनेक ठिकाणी निदर्शने करण्यात आली. बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या आसाममधील जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाल्याचे चित्र समोर आले. आता बराक व्हॅलीमधील हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये बांगलादेशी ग्राहकांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. जोपर्यंत हिंदू समाजातील लोकांवर होणारे हल्ले थांबत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही बांगलादेशींना मदत केली जाणार नाही, असे व्यापाऱ्यांनी म्हटले आहे.

बराक व्हॅली प्रदेशात कचर, श्रीभूमी (पूर्वीचे करीमगंज) आणि हैलाकांडी या तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. ही दरी बांगलादेशच्या सिल्हेट प्रदेशाशी १२९ किमी लांबीची सीमा सामायिक करते. हॉटेल आणि रेस्टॉरंटवर बंदी घालण्यापूर्वी श्रीभूमी जिल्ह्यातील आयात-निर्यात असोसिएशनने बांगलादेशसोबतचे सर्व व्यापारी संबंध स्थगित करण्याचा निर्णय घेतलाय. बराक व्हॅली हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशनचे अध्यक्ष बाबुल राय म्हणाले की, बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांची परिस्थिती चिंताजनक आहे. हे आम्ही स्वीकारू शकत नाही. जोपर्यंत परिस्थिती सुधारत नाही, हिंदूंवरील अत्याचार थांबत नाहीत, तोपर्यंत बराक खोऱ्यातील तीन जिल्ह्यांमध्ये शेजारील देशातील एकाही नागरिकाला परवानगी दिली जाणार नाही. आमचा निषेध व्यक्त करण्याचा हा प्रकार आहे. ते म्हणाले की, बांगलादेशच्या जनतेने देशात स्थिरता परत येईल याची खात्री करावी. परिस्थिती सुधारली तरच आम्ही आमच्या निर्णयावर पुनर्विचार करू शकतो.

### बांगलादेशातील कोणत्याही रुग्णावर उपचार नाही

अलीकडेच त्रिपुरामध्ये ऑल त्रिपुरा हॉटेल आणि रेस्टॉरंट ओनर्स असोसिएशनने बांगलादेशी लोकांना रेस्टॉरंटमध्ये जेवण देण्यास नकार दिला होता. हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांच्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला होता. शेजारील देशात अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ बांगलादेशातील कोणत्याही रुग्णावर उपचार करणार नसल्याची घोषणा यापूर्वी आयएलएस रुग्णालयाने केली होती.

# जगातील सर्वात मोठी स्मशानभूमी!

## सतत जळत असतात चिता; बनारसमध्ये मणिकर्णिका घाट म्हणून आहे प्रसिद्ध

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हिंदू धर्मात कोणाचा मृत्यू झाला तर त्याच्यावर अंतिम संस्कार करुन त्याला जाळले जाते. इतर धर्मात तसे होत नाही. ईसाई आणि मुस्लीम धर्मात मृतदेह पुरण्याची प्रथा आहे. जिथे मृतदेह दहन केले जाते त्याला स्मशानभूमी म्हणतात. भारतात जवळपास सर्वच शहरांमध्ये आणि गावांमध्ये स्मशानभूमी असतेच. कुठे मोठी तर कुठे लहान असेल पण ती असतेच. पण तुम्हाला माहित आहे का की भारतातील सर्वात मोठी स्मशानभूमी कुठे आहे. अनेकांना कदाचित हे माहित नसेल की ती बनारसमध्ये आहे. ज्याला मणिकर्णिका घाट असे म्हणतात.**



मनिकर्णिका घाट ही भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठी स्मशानभूमी आहे. असं सांगता की, येथे एका दिवसात जवळपास 300 हून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले जातात. ही भारतातील एकमेव अशी स्मशानभूमी आहे. जिथे सतत चिता जळत असतात.

बनारस हे काशी आणि वाराणसी नावाने ही ओळखले जाते. हे भारतातील सर्वात जुन्या शहरांपैकी एक आहे. वाराणसीची स्थापना सुमारे 5000 वर्षांपूर्वी झाल्याचे म्हटले जाते. काही तज्ज्ञांचे मत आहे का की हे शहर 3000 वर्षे जुने आहे. बनारसमध्ये एकूण ८४ घाट आहेत. त्यातील सर्वात मोठा घाट मणिकर्णिका आहे.

भारतातील सर्वात मोठे स्मशानभूमी असल्याने येथे आजुबाजुच्या अनेक गावांमधून आणि शहरातून मृतदेह येतात. 300 हून अधिक मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याची सोय येथे आहे. मणिकर्णिका घाटाबाबत अशी मान्यता आहे की, येथे माणसावर अंत्य संस्कार केले तर त्याच्या आत्म्याला मोक्ष प्राप्त होतो. आणि याच कारणामुळे भारतातील दुर्गम भागातूनही लोकं येथे शेवटी अंत्य संस्कारासाठी येतात.

### चिता सतत जळत राहतात

मणिकर्णिका घाटावर नेहमीच चिता जळत राहतात. जगात काहीही झाले तरी येथे 24 तास चिता जळत असतात. याबाबत अनेक कथा प्रचलित आहेत. एका पौराणिक कथेनुसार मणिकर्णिका घाटाला माता पार्वतीने शाप दिला होता की येथील आग कधीच विझणार नाही.

### असे पडले मणिकर्णिका नाव

कथा अशी आहे की, एकदा माता पार्वती या ठिकाणी स्नान करत होत्या. या दरम्यान त्यांचे कर्णफुले येथील तलावात पडले. त्यामध्ये एक रत्नही होतं. ते शोधण्यासाठी खूप प्रयत्न केले गेले. मात्र ते सापडले नाही. त्यामुळे माता पार्वती यांना खूप राग आला. म्हणूनच त्यांनी या जागेला शाप दिला की जर माझे रत्न मिळाले नाही तर ही जागा नेहमी जळत राहिल. यामुळेच येथे चिता सतत जळत असतात, यामुळेच या ठिकाणाचे नाव मणिकर्णिका पडले असे ही म्हटले जाते.

# जुही चावलाची लेक दिसते फारच सुंदर

आपलं सौंदर्य आणि दमदार अभिनयाने ९० च्या दशकात प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जुही चावला होय. जुहीने आपल्या करिअरमध्ये एकापेक्षा एक अनेक सुपरहिट चित्रपट दिले. आता ती फारसे चित्रपट करत नसली तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. जुहीने उद्योगपती जय मेहता यांच्याशी लग्न केलंय. जय व जुही यांना जान्हवी व अर्जुन नावाची दोन अपत्ये आहे. जुहीची लेक जान्हवी २३ वर्षांची आहे. आई अभिनेत्री असली तरी जान्हवीला मात्र अभिनय क्षेत्रात करिअर करायचं नाही. जान्हवी मेहता अभ्यासात प्रचंड हुशार असून तिने मे २०२३ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून ग्रॅज्युएशन पूर्ण केलंय. जान्हवीला अभिनेत्री व्हायचं नाही. तिला क्रिकेटची खूप आवड आहे आणि तिला लेखिका व्हायचं आहे. तसेच जान्हवीला पुस्तकं वाचायला खूप आवडतं, असं तिच्या आईने सांगितलं होतं.जुही चावलाने न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीदरम्यान सांगितलं होतं की, बॉलीवूडमध्ये काहीतरी मोठं करण्याची स्पर्धा स्टार किड्समध्ये सुरू असताना दुसरीकडे तिची मुलगी जान्हवी मेहताला लाइमलाइटपासून दूर राहायला आवडतं. “स्वतःच्या मुलांचे कौतुक करू नये, पण ती एक हुशार मुलगी आहे आणि तिचा शैक्षणिक रेकॉर्डही खूप चांगला आहे. इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशनमध्ये तिने जबरदस्त कामगिरी केली आहे. तिने हिस्ट्री इन इंडियामध्ये अव्वल स्थान पटकावले होते. ती त्याच्या शाळेत पहिली आली होती, असं जुही चावला म्हणाली होती. याशिवाय जुही चावलाने खुलासा केला होता की तिची मुलगी जान्हवी मेहताला क्रिकेट खूप आवडतं. “जेव्हा जान्हवी क्रिकेट आणि खेळाडूंबद्दल बोलते तेव्हा तिच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसतो. कधी कधी मला प्रश्न पडतो की हे सर्व ज्ञान कुठून येतं. मलाही खूप आश्चर्य वाटतं, पण तिने हे स्वतःसाठी निवडलं आहे, त्यामुळे मी त्याचे श्रेय घेऊ शकत नाही,” असं जुहीने सांगितलं होतं.जुही चावला पुढे म्हणाली, “ती (जान्हवी मेहता) त्या स्टार किड्सपेक्षा वेगळी आहे ज्यांना पडद्यावर स्वतःला अभिनेता किंवा अभिनेत्री म्हणून बघायचं आहे.

# अल्लू अर्जुन-रश्मिकाच्या अभिनयाची जादूही फिकीच!



उत्तम मिसळ खायला जावं आणि चमचमीत तिखट रस्सा मिळण्याऐवजी फक्त त्याच्या नावाखाली वाफाळलेलं गरम पाणी आलं तर काय वाटेल? साबुदाण्याची खिचडी खाताना गारेचे खडेच खडे लागले तर कसं वाटेल? गॅसचा फुगा दिसतो खूप छान पण तो उंचवर जाताना पाहण्यात एक मजा असते. पण असा फुगा उंच आकाशात जाण्याआधीच १०-१५ फुटांवरच फुटला तर काय होईल? हे विचारण्याचं कारणही तसंच आहे. ‘पुष्पा 2’ नावाचा ( PUSHPA 2 ) अल्लू अर्जुनचा सिनेमा म्हणजे हे तीन अनुभव घेण्यासारखाच आहे. ‘पुष्पा 2’ अर्थात ‘पुष्पा द रुल’ सिनेमाचं दिग्दर्शन सुकुमारने केलं आहे. मात्र हा सुकुमारचा सुमारपट आहे असंही या सिनेमाबाबत म्हणता येईल.पुष्पा 2 ( PUSHPA 2 ) जपानमधून सुरु होतो आणि चित्तूरमध्ये संपतो. संपतो म्हणजे खरंतर तिसऱ्या पार्टसाठी पुन्हा सुरुच होतो. पण ३ तास १० मिनिटांच्या काळात आपण प्रेक्षक म्हणून सिनेमा अक्षरशः सहन करत राहतो. अल्लू अर्जुन पुष्पाच्या आधीच्या ॲटीट्यूडमध्येही नीटसा वावरलेला नाही. काही प्रसंग उत्तम जमले आहेत. बाकी सिनेमा ३ तास १० मिनिटं सुरु असतो म्हणून पहावा लागतो असाच आहे. फहाद फासिलचा व्हिलन म्हणजेच भंवर सिंह या भागात स्ट्राँग असेल असं वाटलं होतं कारण पुष्पा दर बिगनिंगच्या शेवटाकडे त्याची एंट्री झाली होती पण तो व्हिलनपेक्षा कॉमेडियन जास्त वाटतो.

# वाजपेयी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर

मनोज वाजपेयी यांनी आजवर कायम वेगळी आणि परिघाबाहेर विचार करणारी पात्रे साकारली आहेत. ‘गँग ऑफ वासेपूर’, ‘दाऊद’, ‘सत्या’, ‘तमन्ना’, ‘सरकार ३’ असे एकपेक्षा एक थ्रिलर आणि मनोरंजनासाठी पैसा वसूल ठरणारे चित्रपट त्यांनी सिनेसृष्टीला दिले आहेत. १९९८ साली मनोज वाजपेयी यांचा ‘सत्या’ हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने त्यावेळी बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केली होती. प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली होती. त्यामध्ये मनोज वाजपेयी यांनी भिकू म्हात्रे हे पात्र साकारले होते. या चित्रपटानंतर मनोज वाजपेयी घराघरांत पोहोचले.या पार्श्वभूमीवर आता मनोज वाजपेयी पुन्हा एकदा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांच्याबरोबर काम करणार आहेत.

# आलियाची परवानगी का?



या सिनेमाने छप्परफाड कमाई केली. अनेकांनी या सिनेमावर टीकाही केली तर काही जणांनी या सिनेमाची स्तुती केली. सिनेमाने कोट्यवधी रुपये कमवले आहेत. सिनेमात ॲक्शन सीन आणि इंटिमेट सीनही आहेत. रणबीर कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या इंटीमेट सीनची चर्चाही झाली. या इंटीमेट सीनसाठी आलिया भटने परवानगी दिली होती का? यावर रणबीर कपूरने उत्तर दिलं आहे.आहे. जनसत्तानं याबाबत अधिकृतरीत्या माहिती देणारे वृत्त दिले आहे.ॲनिमल या सिनेमात रणबीर कपूर, रश्मिका मंदाना आणि तृप्ती डिमरी यांच्या भूमिका आहेत. तृप्ती डिमरी आणि रणबीर कपूर या दोघांचे इंटीमेट सीन चर्चेत आले होते. भाभी २ हे सिनेमातलं तिचं नाव ट्रेंडमध्येही आलं होतं. या सीनच्या चित्रिकरणाच्या वेळी पाचच लोक उपस्थित होते. मात्र रणबीरने याबाबत जे भाष्य केलं आहे त्यामुळे या सीनची आणि सिनेमाची आठवण अनेकांना झाली आहे. तृप्ती डिमरीबरोबरच्या सीनसाठी आलियाची परवानगी घेतली होती का? यावर रणबीर कपूर म्हणाला, “मी खरंतर हा सीन करताना थोडा घाबरलो होतो. पण आलियाने पत्नी म्हणून मला सपोर्ट केला. आम्ही दोघंही एकमेकांच्या कामाबाबत ॲनिमलच्या शूटिंग दरम्यान तृप्ती डिमरीसह इंटीमेट सीनबाबत मी सांगितलं होतं.

# लेकीच्या जन्मानंतर माहेरी आहे दीपिका पादुकोण

लोकप्रिय गायक पंजाबी गायक व बॉलीवूड अभिनेता दिलजीत दोसांझ भारतातील अनेक शहरांमध्ये परफॉर्म करतोय. सध्या त्याच्या ‘ची चांगलीच चर्चा आहे. शुक्रवारी (६ डिसेंबरला) दिलजीतच्या गाण्यांवर बंगळुरूकर थिरकले. त्याच्या या कॉन्सर्टमध्ये चाहत्यांना एक सरप्राईज मिळालं. दिलजीत दोसांझच्या बंगळुरूतील कॉन्सर्टमध्ये ‘दुआ’ची आई म्हणजेच अभिनेत्री दीपिका पादुकोणनने हजेरी लावली. दीपिका सध्या माहेरी आहे आणि आई झाल्यानंतर पहिल्यांदाच ती सार्वजनिक ठिकाणी दिसली. दीपिका बॅकस्टेजला असताना दिलजीतने आधी दीपिकाच्या ब्रँडच्या एका प्रॉडक्टबद्दल माहिती दिली. त्यानंतर त्याने ‘तुमच्या शहराची शान’ म्हणत दीपिकाला स्टेजवर बोलावलं आणि उपस्थितांना सरप्राईज दिलं. दीपिका मंचावर आल्यावर



दिलजीतने ‘तेरा लव्हर’ हे गाणं गायलं. दीपिकाही या गाण्यावर मंचावर थिरकली. आई झाल्यानंतर दीपिका पहिल्यांदाच सार्वजनिक ठिकाणी दिसल्याने चाहतेही खुश झाले. दीपिकाने सर्वांना नमस्कार म्हणत त्यांच्याशी संवाद साधला. दिलजीतने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आहे.दीपिका पादुकोणने खूप चांगलं काम केलं आहे. आपण तिला मोठ्या पडद्यावर पाहिलं आहे. स्वबळावर तिने बॉलीवूडमध्ये स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. तुम्हा सर्वांना तिचा अभिमान असायला हवा. खूप खूप प्रेम,” असं दिलजीत दीपिकाबद्दल म्हणाला.दीपिका पादुकोण व रणवीर सिंग लग्नानंतर सहा वर्षांनी आई-बाबा झाले. दीपिकाने तीन महिन्यांपूर्वी ८ सप्टेंबर रोजी एका गोंडस मुलीला जन्म दिला. रणवीर व दीपिका यांनी आपल्या लाडक्या लेकीचं नाव दुआ पादुकोण सिंह असं ठेवलं आहे. दुआच्या जन्मानंतर पहिल्यांदाच दीपिका दिलजीतच्या कॉन्सर्टमध्ये दिसली. सध्या तिचे कॉन्सर्टमधील व्हिडीओ चांगलेच व्हायरल झाले आहेत.

# चेंडूच्या वेगासमोर बॅटचे झाले दोन तुकडे

## कुमाराने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना आश्चर्यचकित केले

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात २ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. त्याचा दुसरा सामना सेंट जॉर्ज पार्कच्या मैदानावर ५ डिसेंबरपासून खेळवला जात आहे. सामन्याच्या दुस-या दिवशी श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज लाहिरू कुमाराने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना आश्चर्यचकित केले. दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावात त्याने १०० विकेट्सचा टप्पा गाठला.त्यानंतर त्याने आपल्या वेगवान चेंडूने कागिसो रबाडाची बॅट तोडली.**





### काही वेळ खेळ थांबवावा लागला

ज्यामध्ये अँजेलो मॅथ्यूज ४० आणि कामेंदू मेंडिस ३० धावांवर नाबाद खेळत होते. याशिवाय पथुम निसांकाने ८९ धावांची खेळी केली तर दिनेश चंडिमलने ४४ धावांची खेळी केली. आफ्रिकेकडून आतापर्यंत रबाडा, पॅटरसन आणि केशव महाराज यांनी गोलंदाजीत १-१ विकेट घेतले आहेत.रबाडाच्या बॅटचे दोन तुकडे झाल्याची घटना कसोटीच्या दुसऱ्या दिवशी घडली. काइल वेरेन आणि कागिसो रबाडा यांच्यात ९व्या विकेटसाठी ७६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी झाली. ही भक्कम भागीदारी तोडण्यासाठी ९०व्या षटकात लाहिरू कुमाराला चेंडू देण्यात आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याने १३७ च्या वेगाने जोरदार बाऊन्सर मारण्याचा प्रयत्न केला. रबाडा हा चेंडू डिफेंड करण्यासाठी गेला असता त्याची बॅट तुटली. या घटनेमुळे काही वेळ खेळ थांबवावा लागला.

रबाडाच्या बॅटचे दोन तुकडे झाल्याची घटना कसोटीच्या दुसऱ्या दिवशी घडली. काइल वेरेन आणि कागिसो रबाडा यांच्यात ९व्या विकेटसाठी ७६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी झाली. ही भक्कम भागीदारी तोडण्यासाठी ९०व्या षटकात लाहिरू कुमाराला चेंडू देण्यात आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याने १३७ च्या वेगाने जोरदार बाऊन्सर मारण्याचा प्रयत्न केला. रबाडा हा चेंडू डिफेंड करण्यासाठी गेला असता त्याची बॅट तुटली. या घटनेमुळे काही वेळ खेळ थांबवावा लागला. गकेबरहा येथे खेळल्या जात असलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ज्यात त्यांनी पहिल्या डावात एकूण ३५८ धावा केल्या होत्या. यामध्ये रायन रिकेल्टन आणि काईल व्हेरेनी यांनी केलेल्या उत्कृष्ट शतकी खेळीने ही धावसंख्या गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसऱ्या दिवसाच्या खेळात, कागिसो रबाडा फलंदाजी करत असताना, लाहिरू कुमाराने टाकलेल्या ९०व्या षटकातील चौथ्या चेंडूवर रबाडाने फॉरवर्ड डिफेन्स करण्याचा प्रयत्न केला, ज्यात चेंडू त्याच्या बॅटच्या हँडलजवळ आदळला. ज्यामुळे बॅटचे २ तुकडे झाले.रबाडाने केवळ एका हाताने या चेंडूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, त्याने आधीच एका हाताने बॅट सोडली होती. पहिल्या डावात रबाडाने एकूण २३ धावा केल्या ज्यात त्याने ४० चेंडूंचा सामना केला.दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव ३५८ धावांवर आटोपल्यानंतर श्रीलंकेच्या संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात तीन गड्यांच्या मोबदल्यात २४२ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये अँजेलो मॅथ्यूज ४० आणि कामेंदू मेंडिस ३० धावांवर नाबाद खेळत होते. याशिवाय पथुम निसांकाने ८९ धावांची खेळी केली तर दिनेश चंडिमलने ४४ धावांची खेळी केली. आफ्रिकेकडून आतापर्यंत रबाडा, पॅटरसन आणि केशव महाराज यांनी गोलंदाजीत १-१ विकेट घेतले आहेत.रबाडाच्या बॅटचे दोन तुकडे झाल्याची घटना कसोटीच्या दुसऱ्या दिवशी घडली. काइल वेरेन आणि कागिसो रबाडा यांच्यात ९व्या विकेटसाठी ७६ चेंडूत ५६ धावांची भागीदारी झाली. ही भक्कम भागीदारी तोडण्यासाठी ९०व्या षटकात लाहिरू कुमाराला चेंडू देण्यात आला. या षटकातील चौथ्या चेंडूवर त्याने १३७ च्या वेगाने जोरदार बाऊन्सर मारण्याचा प्रयत्न केला. रबाडा हा चेंडू डिफेंड करण्यासाठी गेला असता त्याची बॅट तुटली. या घटनेमुळे काही वेळ खेळ थांबवावा लागला. गकेबरहा येथे खेळल्या जात असलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, ज्यात त्यांनी पहिल्या डावात एकूण ३५८ धावा केल्या होत्या. यामध्ये रायन रिकेल्टन आणि काईल व्हेरेनी यांनी केलेल्या उत्कृष्ट शतकी खेळीने ही धावसंख्या गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसऱ्या दिवसाच्या खेळात, कागिसो रबाडा फलंदाजी करत असताना, लाहिरू कुमाराने टाकलेल्या ९०व्या षटकातील चौथ्या चेंडूवर रबाडाने फॉरवर्ड डिफेन्स करण्याचा प्रयत्न केला, ज्यात चेंडू त्याच्या बॅटच्या हँडलजवळ आदळला. ज्यामुळे बॅटचे २ तुकडे झाले.रबाडाने केवळ एका हाताने या चेंडूचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, त्याने आधीच एका हाताने बॅट सोडली होती. ४० चेंडूंचा सामना केला.दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव ३५८ धावांवर आटोपल्यानंतर श्रीलंकेच्या संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत पहिल्या डावात तीन गड्यांच्या मोबदल्यात २४२ धावा केल्या होत्या.

# गस अॅटकिन्सनने घडवला इतिहास

## उत्कृष्ट कामगिरी करणारा ठरला जगातील पहिला गोलंदाज

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंड वि न्यूझीलंड कसोटीत इंग्लिश संघाच्या गोलंदाजाने मोठी कामगिरी केली आहे. अॅटकिन्सनने भेदक गोलंदाजी करत कसोटी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेतली आहे. क्रिकेटच्या मोठ्या फॉरमॅटमध्ये सात वर्षांनंतर एका गोलंदाजाने इंग्लंडसाठी हॅटट्रिक घेतली आहे. अॅटकिन्सनने नॅथन स्मिथ, मॅट हेन्री आणि टीम साऊदी यांना लागोपाठ तीन चेंडूत पॅव्हेलियनमध्ये पाठवून हॅट्रिक पूर्ण केली.**





### इंग्लंडलाही 155 धावांची आघाडी

गस अॅटकिन्सनने ३५ व्या षटकात हॅटट्रिक घेतली. या षटकातील तिसऱ्या चेंडूवर अॅटकिन्सनने प्रथम न्यूझीलंडच्या नॅथन स्मिथला बाद केले. पाचव्या चेंडूवर टिम साऊदीची विकेट घेत त्याने आपली हॅट्रिक तर पूर्ण केलीच पण किवी संघाचा पहिला डावही संपवला.गस अॅटकिन्सनने न्यूझीलंडच्या पहिल्या डावात ८.५ षटकांत ३१ धावा देत हॅट्रिकसह ४ विकेट घेतले. या दमदार कामगिरीमुळे न्यूझीलंडचा पहिला डाव १२५ धावांवर मर्यादित असतानाच इंग्लंडलाही १५५ धावांची भक्कम आघाडी मिळाली.

इंग्लंडने पहिल्या डावात केलेल्या २८० धावांच्या प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संपूर्ण संघ अवघ्या १२५ धावांवर गडगडला.कसोटीत अनेक गोलंदाजांनी हॅटट्रिक घेतली आहे. जगातील ४४ गोलंदाजांनी आतापर्यंत हॅट्रिक घेतली आहे. त्यापैकी तीन गोलंदाजांना आजवर २-२ वेळा कसोटी हॅटट्रिक घेतली आहे. म्हणजेच कसोटी क्रिकेटमध्ये एकूण ४७ हॅटट्रिक घेतल्या गेल्या आहेत. यामध्ये २६ वर्षीय इंग्लंडचा गोलंदाज गस अॅटकिन्सनची हॅटट्रिक ऐतिहासिक ठरली. वेलिंग्टन येथील बेसिन रिझर्व्ह येथे न्यूझीलंडविरुद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्यात इंग्लंडच्या या वेगवान गोलंदाजाने हॅटट्रिक घेतली आणि हिच या हॅटट्रिकची खासियत आहे.वेलिंग्टन कसोटीत सलग ३ चेंडूत न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील अखेरचे ३ विकेट गस अॅटकिन्सनने आपली कसोटी हॅटट्रिक घेतली. यासह, बेसिन रिझर्व्हवर कसोटी हॅटट्रिक घेणारा तो जगातील पहिला गोलंदाज ठरला. ७ वर्षांनंतर हॅट्रिक घेणारा तो इंग्लंडचा पहिला वेगवान गोलंदाज ठरला.